स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ग्रामीण प्रशासनातील महिला अधिकारी आणि पदाधिकारी यांची भूमिका: विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा.

मानवविद्या शाखेंतर्गत लोकप्रशासन विषयात पीएच. डी पदवीसाठी सादर करावयाच्या

शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

अश्विनी दयानंद गायकवाड

मार्गदर्शक
डॉ. मीरा फड
लोकप्रशासन विभाग,
यशवंत महाविद्यालय नांदेड

मार्च २०२२

ग्रामीण प्रशासनातील महिला अधिकारी आणि पदाधिकारी यांची भूमिका: विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा

प्रस्तावना:

प्राचीन काळापासून भारतामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था हया विपूल प्रमाणात अस्तित्वात होत्या. साधारणतः वैदीक काळामध्ये लोकशाही पध्दतीची प्रशासन व्यवस्था होती. त्या प्रशासन व्यवस्थेचा गाव हा स्थानिक घटक होता. गावामध्ये लोकशाहीनुसार 'ग्रामसभा' निवडण्यात येत असे. वैदीक कालखंडात खेडी स्वतःचा कारभार स्वतः करीत असत व मध्यवर्ती सत्तेचा त्यांच्या कारभारात हस्तक्षेप होत नसे. ग्रामप्रमुख लोकांकडून निवडले जात होते ते त्यांना जबाबदार असत.

मौर्यकाळात मात्र वैदीक काळाच्या तुलनेने बरीच प्रगती झाली. राज्याच्या कार्यक्षेत्रात वाढ झाल्याने प्रशासनाचा विकास आणि विस्तार झाला. या काळातील राज्यव्यवस्था ही केंद्रीत स्वरुपाची होती. प्रत्येक गावात एक प्रमुख असे त्याला ग्रामिका किंवा 'ग्रामाधिपती' असे म्हणत असत. त्याबरोबरच ग्रामीण प्रशासनात त्या गावातील वयोवृध्द व प्रतिष्ठीत व्यक्तींची मंडळे असत. वेळोवेळी अनेक प्रसंगी ही मंडळे एकत्र येऊन समस्या सोडवीत असत. मौर्य काळात प्रशासनाच्या सोयीसाठी प्रांतास जिल्हयामध्ये विभाजीत केले होते. जिल्हयाच्या प्रमुखास ' स्थानिक ' म्हटले जात असे. पाच वा दहा गावाच्या प्रमुखास 'गोप म्हटले जात असे चंद्रगुप्त मौर्य यांने स्वायत्त शासनप्रणाली सुरु करुन शासनाच्या विकेंद्रीकरणाचे धोरण अवलंबीले प्राचीन भारतातील प्रमुख ग्रामीण संस्था हया ग्रामप्रमुख, ग्रामसभा, ग्रामपंचायत व जातीपंचायत या स्वरुपात होत्या. ग्रामप्रमुखाची निवड लोकाकडून केली जात असे पंरतू पुढे ही पध्दत मागे पडली व नंतर वंशपरंपरेच्या तत्वावर या प्रमुखाची निवड करण्याची पध्दती सुरु झाली. जर संबंधिताला वारस नसेल तर ग्रामप्रमुखत्व केंद्रीय सत्तेकडून दुसऱ्या कुटूंबाकडे दिले जात असे. या गाव प्रमुखास वैदीक काळात ' ग्रामीणी ' कौटिल्याच्या काळात ' ग्रामीका व महाराष्ट्रात त्यास ' पट्टालिका ' असा उल्लेख केल्याचे दिसून येते. त्याचे प्रमुख कार्य ग्रामसंरक्षण कर

वसुली, नोंदणी करणे, ग्रामसभेस मार्गदर्शन करणे ही कार्य करावी लागत असे. प्राचीन स्थानिक संस्थांची ' ग्रामसभा ' ही एक अत्यंत महत्त्वाची संस्था होती. ग्राम प्रशासनात संघटितपणे कार्य करणारी ही प्राथमिक संस्था होती. महाराष्ट्रात अशा स्वरुपाच्या संस्थेत गावातील सर्व कुटूंबियांचा समावेश होत असे. ग्रामसभेतील सर्व सदस्यांना विविध प्रदेशात विविध नावाने ओळखण्यात येत असे. महाराष्ट्रात त्यांना ' महत्तर ' असे म्हणत असत. भारतात प्राचीन काळापासून ग्रामपंचायत ही राजकीय संस्था अस्तित्वात आहे. या ग्रामपंचायतीस वैदीक काळात ' सभा ' या नावाने ओळखण्यात येत असे. मौर्यकाळात सुध्दा ग्रामपंचायती अस्तीत्वात होत्या. ग्रामपंचायत ही गावाची कार्यकारीणी होती. गावातील प्रतिष्ठीत व्यक्तींचा यात समावेश असे. हया ग्रामपंचायती महसूल वसुली, मंदीरांचे प्रशासन, नैसर्गीक आपत्तीच्या काळात ग्राम संस्थांना सहाय्य करणे गावच्या दृष्टीने उपयुक्त व जीवनावश्यक गोष्टींची पुर्तता करणे या स्वरुपाची कामे करीत होती.

ग्रामीण विकासाचे महत्व :

स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारतात आर्थिक विकासाची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. मात्र खऱ्या अर्थाने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रामीण विकासाला चालना मिळाल्याचे दिसते. भारतीय राज्यघटनेतील चौथ्या प्रकरणाच्या राजनिती निर्देशक तत्वात राज्यावर ग्रामीण क्षेत्राचा विकास करण्याची जबाबदारी सोपविलेली असून त्या संबंधीच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. पंचायतराज संकल्पनेला लेखी स्वरूप प्राप्त झाल्यामुळे ग्रामपंचायत अधिनियम 1958 पंचायत समिती व जिल्हा परिषद अधिनियम 1961 अंतर्गत विविध ग्रामीण विकासाच्या योजना 2 राबविण्यात आल्या. ग्रामीण भागात जवळपास 70 टक्के जनता राहते. जर भारताला विकसित राज्य बनवायचे असेल तर ग्रामीण विकासाला प्रथम प्राधान्य देणे आवश्यक आहे. याच उद्देशाने पंचवार्षिक योजनाच्या व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या अंतर्गत ग्रामीण विकासाची संकल्पना कार्यक्रम, उपक्रम, प्रकल्प राबविण्यात येत आहेत. ग्रामीण विकासाची संकल्पना अनेक दृष्टीने व्यापक आहे. ग्रामीण विकास मध्ये लोकशाही विकेंद्रीकरण, जनसहभाग, महिला, बालके, अपंग यांचे सशक्तीकरण, आरोग्य, गृह, शिक्षण या

मुलभूत सामाजिक सेवांचा विकास अशा अनेक बाबी अंतर्भूत होत्या. या दृष्टीने 1952 साली सामुदायिक विकास कार्यक्रमाच्या रूपाने मोठे पाऊल उचलले गेल. या कार्यक्रमामुळे सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय संरचनेची पायाभरती झाली मात्र ग्रामीण दारिद्रय कमी करण्यासाठी या योजनेकडून अपेक्षा भंग झाला. या अपयशाचे पडसाद बलवंतराय मेहता समितीमध्ये उमटले. या समितीद्वारे विकासाच्या केंद्रस्थानी जनसहभाग मानला आणि पंचायतराजची शिफारस केली आणि पंचायतराज अस्तित्वात आले. मात्र ते स्थानिक स्वशासन होऊ शकले नाही. भारतीय विकासात मोठे योगदान देणाऱ्या हरितक्रांतीचाही लाभ ठराविक अशा उच्चवर्गांनाच झाला. त्यामुळे भूमिहीन शेतमजूर, दुर्बल मागास लहान शेतकरी कारागीर, बालके, महिला यांच्या समस्या वाढल्या. त्यामुळे या घटकांना केंद्रस्थानी ठेवून शासकीय योजना तयार करण्यात आल्या. सर्वागिण विकासाचा एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम सुरू करण्यात आला. या योजनेने ग्रामीण विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले. मात्र दारिद्रयरेषेखालील लोकांचे प्रमाण वाढत राहीले. प्रारंभापासूनच योजनाच्या केंद्रठिकाणी ग्रामीण विकास व त्यासाठी दारिद्रय निर्मुलन राहिलेले होते आणि ते आजही आहे. याच उद्देशाच्या पूर्ततेसाठी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम अगदी अलिकडच्या काळात निर्माण करण्यात आला आहे. ग्रामीण भागाच्या विकासाच्या उद्दिष्टांची पुर्तता करीत असताना केवळ विकासाच्या योजना निर्माण करून चालत नाही तर त्या विकासाच्या योजनांची अमंलबजावणी करण्यासाठी तितकेच सक्षम प्रशासन निर्माण करणे आवश्यक आहे.

अभ्यास विषय निवडण्याचा हेतूः

महाराष्ट्रातील मराठवाडा या प्रादेशिक विभागात जे ०८ जिल्हे आहेत त्यातील ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक, पार्श्वभूमी असणारा परंतु अलिकडील काळात ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणुन ओळख निर्माण झालेला हिंगोली हा एक जिल्हा असुन संशोधनाकरीता सदरील जिल्ह्याची निवड करण्यात करण्यात आहे.

संशोधनाकरीता विषयाची निवड करत असतांना त्यांची आवश्यकता व महत्व लक्षात घेणे गरजेचे असते. प्रस्तुत संशोधन ही त्यास अपवाद नाही. त्यामुळे ज्या विविध कारणासाठी संशोधनाची गरज आणि महत्व जाणवले त्याची चर्चा करणे गरजेचे ठरते.

पारंपारिक भारतीय समाजाचा विचार करता महिला विविध क्षेत्रात जशा वंचित होत्या तशाच त्या राजकीय क्षेत्रात आणि निर्णय प्रक्रियेत ही वंचितच होत्या. ' चुल आणि मुल ' हेच तिचे कार्यक्षेत्र मानले जात होते. परंतु भारताच्या स्वातंत्र्याबरोबरच भारतीय संविधानाने समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व या त्रिसुत्रीच्या आधारावर महिलांना ही घटनात्मक समानता बहाल केली. पुढे वेगवेगळ्या क्षेत्रात महिलांसाठी जसे आरक्षण आले तसेच ७३ व्या घटना दुरुस्तीने पंचायतराज व्यवस्थेतही महिलांना ३३ टक्के आरक्षण प्राप्त झाले व महिलांचा प्रत्यक्ष राजकीय क्षेत्रातील सहभाग आणि वावर वाढला. शिवाय राजकीय सत्ता ही इतर क्षेत्रातील सत्तेचा एक प्रमुख स्त्रोत मानला जातो. तेंव्हा राजकीय क्षेत्रातील महिलांच्या सहभागामुळे महिला नेतृत्व विकसित होण्यास मदत झाली काय ? स्थानिक पातळीवरील निर्णय प्रक्रियेत महिला प्रत्यक्षात सहभागी होऊन भूमिका पार पडतात काय ? सामाजिक आर्थिक समस्यांची सोडवणुक करण्यासाठी ग्रामीण प्रशासना मधील महिलांचा सहभाग उपयुक्त ठरला काय ? महिलांच्या दर्जात परिवर्तन घडून आले काय ? महिलांकडे पाहण्याचा पुरूषांचा दृष्टीकोन बदलला आहे काय ? महिला पंचायतराज व्यवस्थेत सक्षमपणे आपली भूमिका पार पाडतात काय ? ग्रामीण प्रशासनातील महिला अधिकारी व पदाधिकाऱ्यांच्या सहभागाचा आणि भूमिकेचा चिकित्सक अभ्यास यासारख्या प्रश्नांच्या पाठीमागील वस्तुस्थिती जाणून घेण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन विषयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधन साहित्याचा आढावा:

कोणत्याही विषयाच्या संदर्भात संशोधन कार्य करत असतांना संशोधन विषयाशी संबंध असलेल्या क्षेत्रात पुर्वी झालेल्या संशोधनाचे व विषयाशी संबंधित असलेले ग्रंथ, लेख यांचे सर्वेक्षण करणे आवश्यक असते. कारण त्यामुळे संशोधन विषयाची व्याप्ती, वेगवेगळेपणा, समजण्यास मदत

होते, तसेच अर्थबोध करतांना संबंधित साहित्याचा उपयोग होतो. त्यामुळे संशोधकाने प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित असलेल्या उपलब्ध झालेल्या संशोधित साहित्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

१) सिंह योगेंद्र (१९५८) : योगेंद्र सिंह यांनी सत्ता संरचनेच्या संदर्भात सहा (०६) गावांचा अभ्यास केला. त्यांच्या अध्ययनानुसार गावातील सत्ता संरचनेचे स्वरूप पुढीलप्रमाणे आढळुन आले. गावातील सत्ता उच्चजाती, उच्च वर्गाकडे केंद्रीत झाल्याचे आढळते.ग्रामीण भागात राजकीय सत्ता प्राप्त करण्याकरीता कनिष्ठ जाती, वर्ग संघटीत होऊन स्वतंत्र गट निर्माण करत आहेत. त्यातून ग्रामीण भागात सामाजिक ताणतणाव, असुरक्षिततेची भावना निर्माण होऊन विघटन घडत आहे. धर्मनिरपेक्ष, लोकशाही मूल्यांची उपेक्षा नवीन सत्ता संरचनेत केली जाते. वेगवेगळ्या जाती, वर्गाची आर्थिक संपन्नता व दुर्बलता ग्रामीण सत्तेला प्रभावित करते. यासारखे निष्कर्ष सिंह योगेंद्र यांच्या अध्ययनातुन समोर आलेले आहेत.

२) बेंते आंद्रे (१९६६) : बेंते आंद्रे यांनी तंजोर जिल्ह्यातील श्रीपुरम गावाचा अभ्यास करून परंपरागत ग्रामीण संरचनेमध्ये होत असलेले परिवर्तन स्पष्ट केले. त्यांच्या अभ्यासानुसार सत्ता ही प्रामुख्याने जमीनदार, श्रीमंत वर्गाकडे केंद्रीत होती. सत्तेत ब्राह्मणाला सर्वात वरचे स्थान होते कारण ब्राह्मणाला जमीनदाराबरोबरच धार्मिक, सामाजिक, आर्थिक अधिकार प्राप्त होते. परंतु वर्तमान काळात गावातील सत्ता संरचना बदलली आहे. आज ब्राह्मणेत्तर जाती गावातील सामाजिक व्यवस्थेत, संघटनेत महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत. पारंपारिक समाजातील जन्मतत्वाने प्राप्त होणाऱ्या आर्थिक दर्जाचे महत्त्व आज कमी झाले असून आधुनिक काळात अर्जित दर्जा व व्यक्ती गुणाला महत्त्व प्राप्त झालेले आहे. त्याचबरोबर बहुमताला ही महत्त्व प्राप्त झालेले आहे. अर्थात सत्तेसाठी सामाजिक, आर्थिक प्रतिष्ठा प्राप्त करणारा समुहच राजकीय सत्तेत वरच्या स्थानी जाताना दिसत आहे.

३) शर्मा के.एल. (१९७४) : शर्मा के. एल. यांनी राजस्थानमधील गावांचा अभ्यास राजकीय सत्तेच्या संदर्भात केलेला असून त्यांच्या अध्ययनानुसार, जहागीरदार, जमीनदार आणि त्यांचे अनुयायी यांच्याच

हाती राजकीय सत्ता होती. जाती व्यवस्थेतील श्रेष्ठ स्थानामुळे ब्राह्मण व आर्थिक समृध्दीमुळे वैश्य वर्णीयांचा प्रभाव समाज व्यवस्थेवर जसा होता तसाच ग्रामपंचायतीवर ही त्यांचेच वर्चस्व होते. परंतु नवीन पंचायतराज व्यवस्थेमुळे गावातील सामाजिक परिवर्तनाला सुरूवात झाली. पंचायतीच्या निवडणुकीमुळे जहागीरदार, जमीनदार, ब्राह्मणाऐवजी मध्यमवर्गीय व्यक्तीकडे राजकीय सत्ता येऊ लागली आहे. त्यामुळे पंचायतराज व्यवस्थेत कनिष्ठ जातीकडेही ग्रामीण नेतृत्व येऊन सत्ता संरचनेत बदल होऊ लागला आहे

४) दर्शनकार अर्जुनराव (१९७६) : दर्शनकार यांनी ' पंचायतराज मधील नेतृत्व हिंगोली जिल्ह्याच्या संदर्भात ' या विषयावर १९ ७६ मध्ये संशोधन केलेले आहे. हा अभ्यास करत असतांना त्यांनी १९६७ मध्ये निवडून आलेल्यापुरूष सदस्यांकडून संरचित प्रश्नावलीच्या मदतीने तथ्य संकलित करून स्थानिक नेतृत्वाच्या उदयात जात, पैसा, शिक्षण आणि पारंपारिक दर्जा प्रभावी ठरतो का ? नेत्यांची निर्णय प्रक्रियेतील भूमिका कोणती ? आणि सामाजिक परिवर्तन व अन्य प्रश्नांच्या संदर्भात नेतृत्वाची भूमिका तपासणे या उद्देशाने अभ्यास करत असतांना त्यांना असे आढळले की, नेतृत्व हे सेवेचे माध्यम न मानता प्रतिष्ठेचे पद समजले जाते. नेते आपल्या अनुयायांना अनुदानाच्या खिरापती वाटतात. तर काही ठिकाणी होयबा वृत्तीच्या लोकांना नेतृत्व दिले गेले. सामाजिक दर्जा आणि आर्थिक घटक नेतृत्व निवडण्यात महत्त्वाचे ठरतात. बहुतांशी नेतृत्व मराठा समाजातील लोकांकडे आहे असे दिसुन येते. शिक्षित वर्गाला नेतृत्वाकरीता प्रोत्साहित केले जात आहे. यासारखे अध्ययनाचे निष्कर्ष आढळतात. '

५) हजेल डी लिमा (१९८३) : महाराष्ट्रातील स्थानिक शासनात महिला या नात्याने जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमधील महिला सदस्यांची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पार्श्वभुमी आणि शिक्षण, रोजगार, विवाह कुटुंब या संदर्भातील दृष्टीकोन व जाणीव जागृती पाहणे या उद्देशाने त्यांनी सदरील अध्ययन केले. तेव्हा त्यांच्या अध्ययनाचा जो ठळक निष्कर्ष दिसतो तो म्हणजे उच्च जातीतील महिला, जमीनदाराच्या घरातील स्त्रिया आणि राजकीय प्रभाव असणाऱ्या कुटुंबातील महिलाच पंचायतराज व्यवस्थेत निवडून आलेल्या आहेत.

६) राम आहुजा (१९८५) राम आहुजा यांनी ‘ Awareness of women's rights and their political participation ' असे संशोधन केले. त्यासाठी त्यांनी पश्चिम भारतातील आठ (०८) खेड्यांमधुन ७५३ महिलांचा अभ्यास केला. त्या अभ्यासातुन असे आढळते की, शिक्षित, तरूण आणि आर्थिकदृष्ट्या संपन्न असणाऱ्या महिलांना अशिक्षित वयोवृध्द महिलांच्या तुलनेत अधिक राजकीय जाणीव आहे असे नाही. तर एकूणच महिलांमध्ये कमी राजकीय जाणीव आढळते. त्याचे ठळक कारण म्हणजे अशिक्षितपणा, कौटुंबिक व्यवस्था, पुरूषांवरील अवलंबन आणि राजकीय क्षेत्रातील असमाधानता ही कारणे आढळतात.

संशोधनाची उद्दिष्टे:

1) ग्रामीण प्रशासनामध्ये महिलांना प्रतिनिधित्व देण्यामागे जो उद्देश होता तो कितपत साध्य झाला आहे हे माहित करून घेणे.
2) ग्रामीण प्रशासनामधील महिला अधिकारी आणि पदाधिकारी यांच्या विविध योजनांच्या निर्णय प्रक्रिया आणि अंमलबजावणी संदर्भातील दृष्टीकोनाची माहिती करून घेणे.
3) ग्रामीण प्रशासनामध्ये कार्यरत महिला अधिकारी आणि पदाधिकारी यांच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन कसा आहे याचा शोध घेणे.
4) हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण प्रशासनातील एक महिला अधिकारी व पदाधिकारी म्हणुन कार्य करीत असतांना त्यांना कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते याचा मागोवा घेणे.
5) हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण प्रशासनामध्ये विविध पातळीवर होणाऱ्या निर्णय प्रक्रियेतील महिला लोकप्रतिनिधींचा सहभाग आणि भूमिकेचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके :

1) ग्रामीण प्रशासनातील महिलांचा राजकीय अधिकाराचा वापर त्यांच्या घरातील पुरुष मंडळी सत्तेचा, पदाधिकारी पदाचा अप्रत्यक्षपणे वापर करताना दिसून येतात.

2) हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण प्रशासनातील महिला आधिकारी व पदाधिकाऱ्यांची सामाजिक आर्थिक व राजकीय स्थिती, राहणीमानामध्ये विकास झाला आहे.

3) हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण प्रशासनामधील महिला पदाधिकारी आणि अधिकारी यांच्यातील परस्परसंबंध सौहार्द पूर्ण आहेत त्यामुळे विकास कामांची अंमलबजावणी प्रभावीपणे आणि जलदगतीने होते.

4) जिल्ह्यातील ग्रामीण प्रशासनामध्ये कार्यरत असलेल्या महिला अधिकारी वर्गाचा योजनांच्या अंमलबजावणीमध्ये सक्रिय आणि उत्स्फूर्त सहभाग असतो.

5) ग्रामीण भागातील समस्या मांडणे आणि त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे हे महिला पदाधिकारी यांचा निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभाग असल्यामुळे शक्य आहे.

संशोधन पध्दती:

कोणत्याही विषयाचे तथा घटकाचे, घटनेचे शास्त्रीय अध्ययन करीत असतांना ते वैज्ञानिक पध्दतीने होणे आवश्यक असते. ग्रामीण प्रशासनामधील महिलांच्या सहभागाचे आणि भुमिकेच्या सद्यःस्थितीचे अध्ययन करीत असतांना वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब करणे अपरिहार्य ठरते हे लक्षात घेऊन ग्रामीण प्रशासनातील महिला अधिकारी आणि पदाधिकारी यांची भूमिका: विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा करीत असतांना ग्रामीण प्रशासना मधील सर्वच महिलांच्या सहभागाचे आणि भुमिकेचे अध्ययन करणे संशोधानाच्या मर्यादा लक्षात घेता शक्य नसल्यामुळे संशोधकाने ग्रामीण प्रशासनातील महिला अधिकारी आणि पदाधिकारी यांची भूमिका: विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा हा विषय अध्ययनासाठी निश्चित केलेला असुन प्रस्तुत संशोधनासाठी ' वर्णनात्मक संशोधन आराखड्याची' निवड करण्यात येणार आहे. अभ्यासासाठीची कालमर्यादा, क्षेत्राची व्याप्ती, ग्रामीण प्रशासनामध्ये निवडून आलेल्या महिला लोकप्रतिनिधींची संख्या व भौगोलिक क्षेत्राची व्याप्ती, मोठी असल्यामुळे त्यातून मार्ग काढण्यासाठी संशोधन पध्दतीतील संभाव्यता नमुना निवड प्रकाराच्या अंतर्गत यादृच्छिक नमुना निवड

पध्दतीने हिंगोली जिल्ह्यातील 5 तालुक्यामधुन ग्रामपंचायतीमधील सर्व अधिकारी व पदाधिकाऱ्यांची नमुना म्हणुन निवड करण्यात येणार आहे. हिंगोली जिल्हा परिषद आणि हिंगोली जिल्ह्यातील 5 पंचायत समित्यामधील सर्व महिला अधिकारी व पदाधिकाऱ्यांची नमुना म्हणुन निवड करण्यात येणार आहे.

मुलाखत अनुसूची आणि निरीक्षणाच्या माध्यमातुन प्राथमिक तथ्य सामग्रीचे संकलन करण्यात येणार आहे. याशिवाय द्वितीयक तथ्य सामग्रीच्या संकलनासाठी प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित संदर्भग्रंथ, पुस्तके, शोधपत्रिका, लेख, नियतकालिके, पाक्षिके, मासिके, वृत्तपत्रे आणि प्रकाशित असणारी व प्रकाशित नसलेली माहिती व इंटरनेटचा आधार घेण्यात येणार आहे. संकलित तथ्याचे शास्त्रीयदृष्टीने विश्लेषण करता यावे यासाठी संकेतीकरण, सारणी आणि तक्त्यांचा आधार घेऊन संकलित माहितीचे विश्लेषण करून पंचायतराज संस्थेतील महिला अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांच्या भूमिकेचा चिकित्सक अभ्यास करून संख्यात्मक आणि गुणात्मक विश्लेषण करण्यात येणार आहे. याशिवाय माहिती वाचकाच्या सहज लक्षात यावी यासाठी आवश्यक आणि शक्य त्याठिकाणी पायचार्ट, बारग्राफ, लाईनग्राफ इत्यादींचा आधार घेण्यात येणार आहे.

संशोधन क्षेत्राची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत संशोधन हे हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण प्रशासनातील महिला अधिकारी व पदाधिकाऱ्यांपुरते मर्यादित असेल. तसेच प्रस्तुत संशोधनासाठी १० वर्षांचा (२०११ ते २०२१) कालावधी निश्चित केला जाणार आहे त्या वर्षा पुरतेच मर्यादित असेल.

संशोधन प्रकरणाचा आढावा :

प्रस्तुत संशोधन परिपूर्ण करण्यासाठी एकूण सहा प्रकरणांची आखणी करण्यात येणार आहे ते पुढील प्रमाणे असतील :

प्रकरण- १ प्रस्तावना व विषय प्रवेश :

ग्रामीण प्रशासनातील महिला अधिकारी आणि पदाधिकारी यांची भूमिका: विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा या संशोधन विषयास शास्त्रीय चौकटीत बसवून भाष्य करण्यापूर्वी या विषयाच्या संदर्भात ऐतिहासिक पार्श्वभूमी काय आहे याची माहिती घेणे क्रमप्राप्त ठरते. या संदर्भात भारतातील स्थानिक शासन, महाराष्ट्रातील ग्रामीण प्रशासनाची पार्श्वभूमी, ७३ व्या घटना दुरूस्तीमधुन महिलांना मिळालेले ३३ टक्के आरक्षण, महाराष्ट्रातील आरक्षण विधेयक, महिलांचा राजकारणातील सहभाग, ग्रामीण प्रशासनाचा भारतातील विकास, राजकीय व सामाजिक स्थिती या बाबतची माहिती घेऊन अध्ययन विषयाशी संबंधित संशोधन साहित्याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

प्रकरण -२ अभ्यास क्षेत्राची पार्श्वभूमी आणि संशोधनाचे पध्दती:

सामाजिक संशोधनात संशोधनाच्या योजनेचे मूल्यांकन आराखड्याद्वारे केले जाते या प्रकरणामध्ये अभ्यास क्षेत्राची पार्श्वभूमी या भागात हिंगोली जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भू - विज्ञान व हवामान, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय पार्श्वभूमीचे अवलोकन केले जाणार आहे. संशोधनाचे पध्दतीशास्त्र या भागात प्रस्तुत संशोधनाचा वेगळेपणा, मर्यादा, संकल्पनात्मक चौकट, समस्या सूत्रण, अभ्यास विषय निवडण्याचा हेतू, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितकांची मांडणी, संशोधन आराखडा तंत्राची निवड, नमुना निवड, तथ्य संकलनाची तंत्रे, मुलाखत - अनुसूचीची रचना, क्षेत्र कार्य, संशोधन क्षेत्राची व्याप्ती, तथ्य विश्लेषणाची तंत्रे, संशोधन अहवालाची रूपरेषा याबाबतची मांडणी करून या प्रकरणाचा समारोप करण्यात येणार आहे.

प्रकरण ३ ग्रामीण प्रशासन आणि महिलांची सद्यस्थिती:

या प्रकरणात हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचे अवलोकन केले जाणार आहे. पंचायतराजमध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत या तीन घटकांचा समावेश

होतो. या तिन्ही घटकांमध्ये विविध पंचवार्षिक काळात नेतृत्व करणाऱ्या महिला लोकप्रतिनिधींचा तसेच महिला अधिकारी वर्गाचा विविध दृष्टीकोनातून आढावा घेतला जाणार आहे. इ.स. २०११ ते २०२१ या कालखंडात महिला लोकप्रतिनिधींचा तसेच महिला अधिकाऱ्यांचा ग्रामीण प्रशासनामधील संख्यात्मक सहभाग कशा प्रकारचा होता याचा आढावा घेऊन ग्रामीण प्रशासनामधील महिलांच्या सद्यस्थितीचे अवलोकन या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण ४ ग्रामीण प्रशासनामधील महिला अधिकारी व पदाधिकाऱ्यांची पार्श्वभूमी (कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय) :

ग्रामीण प्रशासनामध्ये निवडून आलेल्या स्त्रियांची कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पार्श्वभूमी जाणून घेणे अनेक कारणांसाठी आवश्यक आहे. कारण स्त्रियांसाठी पंचायतराज व्यवस्थेत आरक्षण आल्यानंतर त्याचा लाभ घेणाऱ्या स्त्रीया कोण आहेत ? राखीव जागा नसणा-या गटातून महिला पदाधिकारी म्हणून निवडून येणाऱ्या स्त्रीया कोण आहेत ? त्यांचा सामाजिक स्तर, कौटुंबिक पार्श्वभूमी, आर्थिक स्थिती, राजकीय पार्श्वभूमी यासारख्या बाबी जाणून घेतल्याशिवाय ग्रामीण प्रशासनामधील महिला लोकप्रतिनिधीच्या वस्तुस्थितीचा अंदाज येणार नाही. तेव्हा उपरोक्त बाबी जाणून घेतल्यानंतरच महिला लोकप्रतिनिधीचे प्राधान्याचे प्रश्न, कार्यपध्दती, विविध प्रश्नांबाबतची मते आणि जिल्ह्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेत लोकप्रतिनिधी म्हणुन निवडून आलेल्या महिलांच्या कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय पार्श्वभूमीचा त्यांच्या सार्वजनिक जीवनातील अथवा राजकारणातील वावरावर काही प्रभाव पडतो काय हे जाणून घेण्याचा प्रयत्न या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण ५ ग्रामीण प्रशासनामधील महिला अधिकारी व पदाधिकाऱ्यांचा सहभाग व अडचणी :

ग्रामीण प्रशासन व्यवस्थेत लोकप्रतिनिधी म्हणून कार्यरत असणा-या स्त्रियांना कामासाठी वेळ देणे आवश्यक असते. बैठकीला कधीतरी जायचे किवा जायचेच नाही, गेले तर बोलायचे नाही, अशा

सदस्यांचा काहीही उपयोग नसतो, ग्रामीण भागातील स्त्रियांची जीवन पध्दती पाहिली तर असे दिसते की, एकटी स्त्री फारशी कधी प्रवासाला निघत नाही. ज्या ठिकाणी पुरूष मंडळी असतील अशा ठिकाणी फारशा बोलत नाहीत, कोणाला तरी सोबत घेऊन बैठकीला जावे लागते. आरक्षणामुळे पंचायतराज व्यवस्थेत किमान ५० टक्के महिला लोकप्रतिनिधी आल्या आहेत. त्या पंचायतराज व्यवस्थेच्या कामकाजात सक्रीय सहभागी होतात काय ? बैठकीला नियमित जातात काय ? बैठकीत बोलतात काय ? बैठकीमध्ये इतर महिला बोलतात काय ? कामासाठी जाताना कोणी सोबत असते काय ? स्वतः निर्णय घेतात काय ? काम करतांना काही अडचणी येतात काय ? कामकाजातील अडथळे त्यांचे सार्वजनिक जीवनातील अनुभव अशा विविध दृष्टीने हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण प्रशासनात कार्यरत असणा-या महिला लोकप्रतिनिधींकडून आणि महिला अधिकारी कडून मुलाखत अनुसूचीद्वारे प्राप्त तथ्यांच्या आधारावर ग्रामीण प्रशासना मधील कामकाजातील महिला लोकप्रतिनिधींचा आणि महिला अधिकारी यांचा सहभाग आणि कामकाजातील त्यांच्या अडचणी याबाबींची मांडणी या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण ६ निष्कर्ष व शिफारशी:

संशोधन विषयाच्या संदर्भात सुरूवातीस गृहितकृत्यांची विधान स्वरूपात मांडणी केले जाणार आहे. नमुन्याच्या आधारे केलेल्या तथ्य संकलनाद्वारे या गृहितकृत्यांची सत्यता तपासली जाणार आहे. तथ्याची समग्रता, भूमिका यासारख्या बाबींची सुसंगती लावता येईल. ग्रामीण प्रशासना मधील निर्वाचित महिला लोक प्रतिनिधी आणि महिला अधिकारी यांची कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमी मुलाखत अनुसूची, निरीक्षण याद्वारे जाणून घेऊन त्याचे विश्लेषण विविध दृष्टीने या प्रकरणात केले जाणार आहे. या माध्यमातून विश्वसनियता या बाबींची काळजीपूर्वक चिकित्सा करून या संशोधन कार्यात काही निश्चित स्वरूपाच्या निष्कर्षाप्रत येणे शक्य होईल. या निष्कर्षाची मांडणी प्रबंधाच्या अंतीम प्रकरणात सविस्तरपणे करून ग्रामीण प्रशासनामधील महिलांचा सहभाग अधिक

वाढविण्याच्या दृष्टीने महत्त्वपुर्ण शिफारशी सुचवून पुढील संशोधनासाठीच्या दिशा स्पष्ट करण्याचा प्रयत्न केले जाणार आहे.

संदर्भ ग्रंथ सूची :

1) Rai B.C (1994) : Local Govt . England, France , U.K..U.S.A & India , Kendra Publisher , Locknow ,
2) 2. धारवाडे बाबुराव : पंचायत प्रशासन , प्रशांत पब्लिकेशन्स , जळगाव , पहिली आवृत्ती ,
3) धारवाडे बाबुराव : उपरोक्त , पहिली आवृत्ती.
4) 4. Srivastva L.N .(1993) : A Simple Study of local self Govt . in India , S.B.D. Publisher , Delhi.
5) Singh Yogendra - 1958, ' The changing power structure of village community A, Case Stady of Six village in Estern U.P : in Rurul Society In India, A.R. Desai (Ed) Popullar Prakashan Bombay.
6) Andre Bente - 1966, Caste, Class and power : changing pattern of Stratification in a Tajor village , Oxford University press Mumbai.
7) GR. Sharma K. L. -1974, The changing Rural Stratification system , orioant Lang Man Ltd. New Delhi.
8) Darshankar Arjunarao -1976, Leadership in Panchyatraj - A Study of Bhir District . 98.Hejel D. Lima- 1983
9) Women in Local Government in Maharashtra, concept publishing company New Delhi.

10) Ahuja Ram -1983, Politial Awaraes and Political Participates of women in Rural Area, The Journal of Sociological studies.

संशोधक
अश्विनी दयानंद गायकवाड

मार्गदर्शक
डॉ. मीरा फड
लोकप्रशासन विभाग,
यशवंत महाविद्यालय नांदेड